**: <u>निशाणी २३अ वर आदेश</u> :**
**(CNR No. MHAKO70009002013)**

१. अर्ज व म्हणणे वाचले. वादीतर्फे युक्तीवाद ऐकला. नियोजित वारस नंतर हजर न राहिल्याने त्यांचा युक्तिवाद न ऐकता अर्ज निकाली काढण्यात येत आहे. वादीने प्रस्तुत अर्ज मयत प्रतिवादी क्र. १ शुभम राहुल इंगळे यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी व त्याप्रमाणे दाव्याचे सरनाम्यात दुरूस्ती करण्यास परवानगी मिळण्याकामी दाखल केला आहे. प्रस्तुत अर्ज कोणत्या कलमाखाली केला ते नमुद नाही, परंतु अर्जातील विनंती व मागणी पाहता प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश २२ अन्वये केला असल्याचे दिसुन येते व त्याप्रमाणे तो निकाली काढण्यात येत आहे. नियोजित वारसाने सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दिले. त्यात त्यांनी नमुद केले की, प्रस्तुत अर्जातील कथनानुसार प्रतिवादी क्र. १ हा दिनांक १२/०३/२०१६ रोजी मयत झाला व हा वादीने दिनांक २३/०८/२०१६ रोजी म्हणजे ५ महिने ११ दिवसानंतर दाखल केला. वारस अभिलेखावर आणण्यासाठी ९० दिवसांचे आंत अर्ज देणे कायदयाने बंधनकारक आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज हा योग्यतेचा नाही. तसेच प्रस्तुत अर्जात अबेटमेंटचा हुकुम बाजुला सारण्याबाबत प्रार्थना नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज खारीज होण्यास पात्र आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज रुपये ५०००/- खर्चासह खारीज करण्यात यावा.

२. अभिलेख पाहिला असता वादीने प्रस्तुत दावा कराराच्या विर्निदिष्ट पालनासाठी व करणात्मक व्यादेश मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत दावा प्रलंबीत असतांना प्रतिवादी क्र. १ शुभम राहुल इंगळे हे दिनांक १२/०३/२०१६ रोजी मयत झाले. प्रस्तुत अर्जा सोबत प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. वरील परिस्थीतीत दावा चालविण्याचा हक्क शाबीत असल्याने वारसाला अभिलेखावर घेवुन सरनाम्यात दुरूस्ती करण्यास परवानगी देणे आवश्यक आहे. सबब अर्ज मंजुर करणे न्यायाचे हितास्तव आवश्यक झालेले आहे. परंतु विलंब झाला असल्याने खर्चासह मंजूर करणे आवश्यक आहे. सबब प्रस्तुत अर्ज खालील आदेशाप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

**<u>: आ दे श :</u>**

१. अर्ज वादींनी प्रतिवादींना रक्कम रुपये २००/- खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. खर्च दिल्यावर मयत प्रतिवादी क्र. १ शुभम राहुल इंगळे यांचे वारसांना

अभिलेखावर घेण्यात येते.

३. वादी यांनी दाव्याच्या सरनाम्यात दुरूस्ती करून दाव्याची दुरूस्त प्रत दाखल करावी.

४. अर्जाचा खर्च अर्जदारावर ठेवण्यात येतो.

सही/-

बाळापूर. (चं. प्र. रघुवंशी)
दिनांक : ०५.०२.२०१९. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बाळापूर.

Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | S.V. Indane. |
| Court Name | : | C.J.J.D. & J.M.F.C., Balapur. |
| Date | : | 05/02/2019. |
| Signed by Presiding Officer on | : | 05/02/2019. |
| Uploaded on | : | 05/02/2019. |

………………………………………………………………………………………………………